**स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय**
**पुरस्कार सन २०२१ जाहीर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : रावापु-२०२२/प्र.क्र.१३८/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ डिसेंबर, २०२२

वाचा :-

१) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.रावापु-१०१२/प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३, दिनांक १० सप्टेंबर, २०१२.
२) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.रावापु-१०१४/प्र.क्र.२३/२०१४/भाषा-३, दिनांक १० सप्टेंबर, २०१४.
३) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. रावापु-१०१४/प्र.क्र.१२०/२०१४/भाषा-३, दिनांक २ फेब्रुवारी, २०१६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील व राज्याबाहेरील ज्या लेखकांनी मराठी भाषेत वाङ्मय निर्मिती केली आहे अशा लेखकांकडून विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तके स्वीकारण्यात येतात. सन २०२१ च्या पुरस्कार स्पर्धेसाठी प्राप्त झालेल्या प्रवेशिकांच्या अनुषंगाने दि.१० सप्टेंबर, २०१२ व दि.२ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयानुसार स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार-२०२१ जाहीर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

सन २०२१ या वर्षात स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या परीक्षण समितीच्या निकालपत्रानुसार सदर ३५ पुरस्कारासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या ३३ लेखक / साहित्यिकांची नांवे सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रातील यादीप्रमाणे जाहीर करण्यास व सदर पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या साहित्यिकांना, संदर्भाधीन दिनांक १० सप्टेंबर, २०१२ व दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयानुसार संबंधित पुरस्कार प्रदान करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार - २०२१ करीता प्रदान करावयाच्या पुरस्काराची रोख रक्कम संदर्भाधीन दिनांक १० सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयातील जोडपत्र -१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जास्तीत जास्त रु.१,००,०००/- (रुपये एक लक्ष फक्त) व कमीत कमी रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) असेल. पुरस्काराचे स्वरुप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. सदर पुरस्काराच्या यादीमध्ये कोणत्या वाङ्मय प्रकारास कोणता पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे, त्याचे नांव, तसेच संबंधित लेखकाचे, पुस्तकाचे व प्रकाशन संस्थेचे नांव आणि पुरस्काराची रक्कम नमूद करण्यात आली असून, पात्र ठरविण्यात आलेल्या ३३ लेखक/ साहित्यिकांच्या नांवाचे विवरणपत्र सोबत जोडत आहे.

३. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच सहाय्यक लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. या प्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र.झेडएफ - ०२, २२०५ - कला व संस्कृती - ०० - १०२ कला व संस्कृती प्रचालन ०१ (योजनेतर योजना) (०१)(०३) - उत्तम पुस्तकांना उत्तेजन (२२०५ ३१९९) ५० इतर खर्च (योजनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०२२-२०२३ या वर्षात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१२०६१६५११३३४०३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aishvarya Nitin Govekar

Digitally signed by Aishvarya Nitin Govekar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=[illegible], pseudonym=[illegible],
serialNumber=[illegible], cn=Aishvarya Nitin Govekar
Date: 2022.12.06 17:26:17 +05'30'

**( ऐश्वर्या गोवेकर )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री(मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,
५. प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
११. संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१२. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१३. संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१४. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. भाषा - ३ (संग्रहार्थ).

## विवरणपत्र

**स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार सन २०२१ पुरस्कारासाठी पात्र ठरविण्यात आलेल्या लेखक/साहित्यिकांची यादी**

| अ. क्र. | वाङ्मय प्रकार | पुरस्कार | रक्कम रु. | लेखकाचे नाव | पुस्तकाचे नांव | प्रकाशन संस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | प्रौढ वाङ्मय - काव्य | कवी केशवसुत पुरस्कार | १,००,०००/- | हबीब भंडारे | जगणं विकणाऱ्या माणसांच्या कविता | गोदा प्रकाशन, औरंगाबाद |
| २) | प्रथम प्रकाशन - काव्य | बहिणाबाई चौधरी पुरस्कार | ५०,०००/- | रमजान मुल्ला | अस्वस्थ काळरात्रींचे दृष्टान्त | गोल्डनपेज पब्लिकेशन, पुणे |
| ३) | प्रौढ वाङ्मय - नाटक/एकांकिका | राम गणेश गडकरी पुरस्कार | १,००,०००/- | नारायण जाधव येळगावकर | यशोधरा | स्वयंदीप प्रकाशन, पुणे |
| ४) | प्रथम प्रकाशन - नाटक/ एकांकिका | विजय तेंडूलकर पुरस्कार | ५०,०००/- | **शिफारस नाही** | | |
| ५) | प्रौढ वाङ्मय - कादंबरी | हरी नारायण आपटे पुरस्कार | १,००,०००/- | प्रशान्त बागड | नवल | पपायरस प्रकाशन, कल्याण |
| ६) | प्रथम प्रकाशन - कादंबरी | श्री.ना.पेंडसे पुरस्कार | ५०,०००/- | श्वेता सीमा विनोद | आपल्याला काय त्याचं ... | राजगृह प्रकाशन, कोल्हापूर |
| ७) | प्रौढ वाङ्मय - लघुकथा | दिवाकर कृष्ण पुरस्कार | १,००,०००/- | अनिल साबळे | पिवळा पिवळा पाचोळा | पपायरस प्रकाशन, कल्याण |
| ८) | प्रथम प्रकाशन - लघुकथा | ग.ल.ठोकळ पुरस्कार | ५०,०००/- | विश्वास जयदेव ठाकूर | नात्यांचे सर्व्हिसिंग | शब्दमल्हार प्रकाशन, नाशिक |
| ९) | प्रौढ वाङ्मय - ललितगद्य (ललित विज्ञानासह) | अनंत काणेकर पुरस्कार | १,००,०००/- | डॉ. नीलिमा गुंडी | आठवा सूर | अभिजीत प्रकाशन, पुणे |
| १०) | प्रथम प्रकाशन - ललितगद्य | ताराबाई शिंदे पुरस्कार | ५०,०००/- | वीणा सामंत | साठा उत्तराची कहाणी... | मधुश्री प्रकाशन, पुणे |
| ११) | प्रौढ वाङ्मय - विनोद | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार | १,००,०००/- | राजा गायकवाड | गढीवरून | मैत्री पब्लिकेशन, पुणे |
| १२) | प्रौढ वाङ्मय - चरित्र | न.चिं.केळकर पुरस्कार | १,००,०००/- | वंदना बोकील -कुलकर्णी | रोहिणी निरंजनी | राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३) | प्रौढ वाङ्मय - आत्मचरित्र | लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार | १,००,०००/- | शरद बाविस्कर | भुरा | लोकवाङ्मय गृह, मुंबई |
| १४) | प्रौढ वाङ्मय - समीक्षा/ वाङ्मयीन संशोधन/ सौंदर्यशास्त्र/ ललितकला आस्वादपर लेखन | श्री. के. क्षीरसागर पुरस्कार | १,००,०००/- | दीपा देशमुख | जग बदलणारे ग्रंथ | मनोविकास प्रकाशन, पुणे |
| १५) | प्रथम प्रकाशन - समीक्षा सौंदर्यशास्त्र | रा.भा.पाटणकर पुरस्कार | ५०,०००/- | प्रा. डॉ. प्रकाश शेवाळे | 'अनुष्टुभ्' नियतकालिकाचे वाङ्मयीन योगदान | हर्मिस प्रकाशन, पुणे |
| १६) | प्रौढ वाङ्मय - राज्यशास्त्र/समाजशास्त्र | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार | १,००,०००/- | सुरेश भटेवरा | शोध... नेहरू - गांधी पर्वाचा ! | मनोविकास प्रकाशन, पुणे |
| १७) | प्रौढ वाङ्मय - इतिहास | शाहू महाराज पुरस्कार | १,००,०००/- | शशिकांत गिरिधर पित्रे | जयतु शिवाजी जयतु शिवाजी | राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे |
| १८) | प्रौढ वाङ्मय - भाषाशास्त्र/व्याकरण | नरहर कुरूंदकर पुरस्कार | १,००,०००/- | सदानंद कदम | मराठी भाषेच्या जडणघडणीची कहाणी वाक्प्रचारांची | मनोविकास प्रकाशन, पुणे |
| १९) | प्रौढ वाङ्मय - विज्ञान व तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह) | महात्मा जोतीराव फुले पुरस्कार | १,००,०००/- | अरुण गद्रे | उत्क्रांती : एक वैज्ञानिक अंधश्रद्धा ? | सुनीधी पब्लिशर्स, पुणे |
| २०) | प्रौढ वाङ्मय - शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय लेखनासह | वसंतराव नाईक पुरस्कार | १,००,०००/- | सचिन आत्माराम होळकर | शेती शोध आणि बोध | भुमाता पब्लिकेशन, लासलगांव, जि. नाशिक |
| २१) | प्रौढ वाङ्मय - उपेक्षितांचे साहित्य (वंचित, शोषित, पिडीत, आदिवासी, कष्टकरी, अनुसूचित जाती व नव बौद्ध इत्यादी) | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार | १,००,०००/- | सुखदेव थोरात | वंचितांचे वर्तमान | लोकवाङ्मय गृह, मुंबई |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २२) | प्रौढ वाङ्मय - अर्थशास्त्र व अर्थशास्त्र-विषयक लेखन | सी.डी. देशमुख पुरस्कार | १,००,०००/- | **शिफारस नाही** | | |
| २३) | प्रौढ वाङ्मय - तत्त्वज्ञान व मानसशास्त्र | ना.गो. नांदापूरकर पुरस्कार | १,००,०००/- | डॉ. आर. के. अडसूळ | सुखाचे मानसशास्त्र | उन्मेष प्रकाशन, पुणे |
| २४) | प्रौढ वाङ्मय - शिक्षणशास्त्र | कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार | १,००,०००/- | डॉ. साहेबराव भुकन | विनोबा आणि शिक्षण | अथर्व पब्लिकेशन्स, धुळे |
| २५) | प्रौढ वाङ्मय - पर्यावरण | डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार | १,००,०००/- | विद्यानंद रानडे | पाण्या तुझा रंग कसा ? | राजहंस प्रकाशन प्रा.लि., पुणे |
| २६) | प्रौढ वाङ्मय - संपादित/ आधारित | रा.ना.चव्हाण पुरस्कार | १,००,०००/- | संपादक किशोर मेढे | दलित - भारत दलित भारतमधील अग्रलेख | सायन पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे |
| २७) | प्रौढ वाङ्मय - अनुवादित | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार | १,००,०००/- | अनुवादक अनघा लेले | फ्रॅक्चर्ड फ्रीडम : तुरुंगातील आठवणी व चिंतन | लोकवाङ्मय गृह ,मुंबई |
| २८) | प्रौढ वाङ्मय - संकीर्ण (क्रीडासह) | भाई माधवराव बागल पुरस्कार | १,००,०००/- | आनंद करंदीकर | वैचारिक घुसळण | साधना प्रकाशन, पुणे |
| २९) | बालवाङ्मय - कविता | बालकवी पुरस्कार | ५०,०००/- | विवेक उगलमुगले | ओन्ली फॉर चिल्ड्रन | कादवा शिवार प्रकाशन, नाशिक |
| ३०) | बालवाङ्मय - नाटक व एकांकिका | भा.रा. भागवत पुरस्कार | ५०,०००/- | डॉ. सोमनाथ मुटकुळे | खेळ मांडियेला | सनय प्रकाशन, नारायणगाव, जि.पुणे |
| ३१) | बालवाङ्मय - कादंबरी | साने गुरूजी पुरस्कार | ५०,०००/- | सौ. वृषाली पाटील | पक्षी गेले कुठे ? | अरुणा प्रकाशन, लातूर |
| ३२) | बालवाङ्मय - कथा ( छोटया गोष्टी, परीकथा, लोककथांसह) | राजा मंगळवेढेकर पुरस्कार | ५०,०००/- | सुहासिनी देशपांडे | किमयागार | छात्र प्रबोधन, पुणे |
| ३३) | बालवाङ्मय - सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे) | यदुनाथ थत्ते पुरस्कार | ५०,०००/- | प्रा. सुधाकर चव्हाण | चला शिकू या वारली चित्रकला | चैत्र क्रिएशन्स् अॅण्ड पब्लिसिटी, पुणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३४) | बालवाङ्मय - संकीर्ण | ना.धो. ताम्हणकर पुरस्कार | ५०,०००/- | प्रा. विद्या सुर्वे बोरसे | कोरा कागद निळी शाई | हर्मिस प्रकाशन, पुणे |
| ३५) | सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार | सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार | १,००,०००/- | परेश वासुदेव प्रभू | गोपालकृष्ण भोबे चरित्र आणि साहित्य | गोवा मराठी अकादमी, पणजी,गोवा |

**स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय**
**पुरस्कार परीक्षण समिती रद्द करणेबाबत व**
**प्रौढ वाङ्:मय अनुवादित या प्रकारातील फ्रॅक्चर्ड**
**फ्रिडम :तुरुंगातील आठवणी व चिंतन या पुस्तकास**
**देण्यात आलेला पुरस्कार रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण -२०२२/प्र.क्र.१४१/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १२/१२/२०२२

वाचा :-

१) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.रावापु-१०१२/प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३, दिनांक १० सप्टेंबर, २०१२.
२) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.रावापु-१०१४/प्र.क्र.२३/२०१४/भाषा-३, दिनांक १० सप्टेंबर, २०१४.
३) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. रावापु-१०१४/प्र.क्र.१२०/२०१४/भाषा-३, दिनांक २ फेब्रुवारी, २०१६.
४) अध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य संसकृती मंडळ यांचे दि.२२.६.२०२२ चे परिक्षण समिती आदेश.
५) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संसकृती मंडळ यांचे क्र.सासंमं/रावापु २०२१/ २०२२/ १९०१, दि.२२.६.२०२२ चे परीक्षण समिती कार्यालयीन आदेश.
६) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संसकृती मंडळ यांचे क्र.सासंमं/प्रकाशने /प्र.क्र.३७६/ २०२२/३१९१, दि.१९.१०.२०२२ चे पत्र.
७) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. रावापु-१०१४/प्र.क्र.१३८/२०२२/भाषा-३, दिनांक ६ डिसेंबर ,२०२२

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र शासनाकडून मराठी भाषेतील उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीस स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्याची योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील व राज्याबाहेरील ज्या लेखकांनी मराठी भाषेत वाङ्मय निर्मिती केली आहे अशा लेखकांकडून विविध वाङ्मय प्रकारातील पुस्तके स्वीकारण्यात येतात.

२. सन २०२१ च्या पुरस्कार स्पर्धेसाठी प्राप्त झालेल्या प्रवेशिकांच्या अनुषंगाने स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यासाठी संदर्भाधीन अ.क्र.४ व ५ येथील गठीत करण्यात आलेल्या परीक्षण समितीच्या संदर्भाधीन दि.१९.१०.२०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने प्राप्त निर्णयानुसार स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार-२०२१ संदर्भाधीन दि.६.१२.२०२२ च्या शासन निर्णयानुसार जाहीर करण्यात आले होते .

३. या शासन निर्णयान्वये संदर्भाधीन क्र.४ व ५ अनुसार अध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांनी गठीत केलेली परिक्षण समिती प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

४.  तसेच, संदर्भाधीन दि.६.१२.२०२२ मधील शासन निर्णयातील अ.क्र.२७ येथील प्रौढ वाङ्‌मय अनुवादित या प्रकारातील फ्रॅक्चर्ड फ्रिडम: तुरुंगातील आठवणी व चिंतन या पुस्तकास देण्यात आलेला पुरस्कार रद्द करण्यात येत आहे.

५.  या अनुषंगाने सचिव महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ यांनी पुढील आवश्यक कार्यवाही करुन त्याचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

६.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१२१२१११९१७८६३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aishvarya Nitin Govekar

Digitally signed by Aishvarya Nitin Govekar
Date: 2022.12.12 11:26:01 +05'30'

(ऐश्वर्या गोवेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव /विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
३. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव,
४. प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१०.संचालक, भाषा संचालनालय, वांद्रा, मुंबई,
११.सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१२.संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१३.अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४.भाषा – ३ (संग्रहार्थ).